महावितरण

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

C.I.N. No. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/ब/५६५८ दिनांक : १०.३.२०१७

परिपत्रक

विषय : MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy व ऐच्छिक Top up Sum Insured ची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ : सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. औसंवि/ब/३८५७, दि. ०२.०२.२०१६

****

म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांचा वेतन पुनर्निधारण करार दि. २६.६.२०१४ तील मुद्दा क्र. ०८ नुसार MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सुरु करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार दि. ०१ जानेवारी २०१५ पासून तिन्ही कंपन्यांतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता (सदर करारातील कुटुंबाच्या व्याख्येप्रमाणे) रु. ०३ लाख मर्यादेपर्यंतची मेडिक्लेम योजना सुरु करण्यात आली होती. सदर योजना सन-२०१६ करिता देखील सुरु ठेवण्यात येवून त्यास ४५ दिवसांची मुदतवाढ दि. ०१.०१.२०१७ ते दि. १४.०२.२०१७ पर्यंत देण्यात आली होती.

सदर योजना दि. १५.०२.२०१७ नंतर १ वर्ष कालावधीकरिता सुरु ठेवण्यासाठी मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित यांनी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महापारेषण व महानिर्मिती तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) व तिन्ही कंपन्यांचे कार्यकारी संचालक (मासं) यांच्यांशी विचारविनिमय करुन म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित व महावितरण कंपनीतील कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील जास्तीत जास्त ०५ सदस्यांसाठी रु. ०३ लाख मर्यादेपर्यंतची MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy - २०१७ करिता सुरु ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy - २०१७ ची ठळक वैशिष्ट्ये.

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance **Policy चा क्रमांक १६३६००/४८/१७/०७८३९** असून ही योजना म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. व महावितरण कंपनीतील दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील जास्तीत जास्त ०५ सदस्यांसाठी लागू राहील. त्याचबरोबर कंपन्यांचे सर्व संचालक, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी तसेच महावितरण कंपनीमधील लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) / (मासं), उपकेंद्र सहाय्यक, विद्युत सहाय्यक व वीजसेवक अशा विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना देखील लागू राहील.

२. या योजनेचा कालावधी दि.१४.०२.२०१७ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि. १५.०२.२०१७ ते दि. १४.०२.२०१८ च्या मध्यरात्रीपर्यंत असा एक वर्षाचा आहे.

३. सदर योजनेतंर्गत कमाल वैद्यकीय विमा संरक्षण, कर्मचारी व त्याच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील खाली नमूद कुटुंबाच्या व्याख्येतील वर्गवारीपैकी कर्मचाऱ्याने निर्देशीत केलेल्या कोणत्याही ०५ सदस्यांसाठी एकत्रित रु. ३ लाख मर्यादेपर्यंत आहे.

४. **कुटुंबाची व्याख्या :-**

- ➢ कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.
- ➢ कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.

(तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.

- १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
- तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
- मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
- कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.

- ➢ कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्याबरोबर राहत असलेले तिचे आई-वडीलांची किंवा सासु-सासऱ्यांपैकी एकाची निवड करता येईल.
- ➢ कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.
- ➢ कर्मचारी / अधिकारी यांवर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्या बाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.
- ➢ या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

५. **सदर योजनेतंर्गत वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयात कॅशलेस अथवा नॉन कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती अनुषंगाने दाखल झाल्यानंतर रुग्णालयामधील उपचारासाठी देण्यात येणारा कक्ष (Room) व त्यासाठीचे दर (Rent) हे खाली नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय राहतील.**

सर्व कर्मचाऱ्यांसाठी रुग्णालयामधील उपचारासाठीच्या कक्षाचा दर (Room Rent) प्रती दिन		
Room & Nursing Charges Per Day. City Wise Limit	Hospitalization In Mumbai and Thane	Rs. 2000/- Per Day
	Hospitalization In Pune, Nashik, Aurangabad and Nagpur	Rs. 1500/- Per Day
	Hospitalization In Rest of Maharashtra	Rs. 1000/- Per Day

टिप : अपघात / अन्य तातडीच्या प्रसंगी (Emergency) / ट्रॉमा / आय.सी. यू. (ICU) मधील उपचारांसाठी वर नमूद केलेले कक्षांचे मर्यादित दर (Room Rent) विचारात न घेता रुग्णालयातील सर्वोत्तम उपचार अनुज्ञेय राहील.

६. **या योजनेमध्ये प्रत्येक आजारांसाठी खर्चाची मर्यादा (Diseasewise Capping) ही सन २०१६ च्या मेडीक्लेम योजनेसारखीच कायम ठेवण्यात आलेली असून फक्त मोतीबिंदु (Cataract) या आजाराकरिता एका डोळयासाठी खर्चाची एकूण कमाल मर्यादा रु. २४०००/- (रु. चोवीस हजार मात्र) इतकी देय राहील.**

७. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण या कंपन्यांमध्ये दि. १५.०२.२०१७ ते दि. १४.०२.२०१८ या कालावधीमध्ये कार्यरत असणारे कर्मचारी या योजनेसाठी पात्र असून त्यांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील ५ सदस्यांना या योजनेचा लाभ देखील सदर कालावधीमध्ये घेता येईल.

अवलंबित सदस्यांची व इतर माहिती अद्ययावत करणेबाबत :-

सदर योजनेसाठी दि. १५.०२.२०१७ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि. १५.०२.२०१७ ते दि. १४.०२.२०१८ या कालावधीकरिता अवलंबित सदस्याच्या नावाचा समावेश अथवा बदल करावयाचा असल्यास MDIndia कंपनीच्या संकेतस्थळावर **http://mseb.mdindia.com:82** येथे Login करुन याबाबतची सुधारीत माहिती दि. २०.०३.२०१७ पर्यंत Online भरावी. सदर माहिती भरल्यानंतर योजनेच्या कालावधीमध्ये कुठल्याही सदस्यांचा पुन्हा नव्याने समावेश केला जाणार नाही. मात्र, नवविवाहीत व नवजात सदस्यांची माहिती कर्मचाऱ्यांना त्या - त्या वेळेस भरता येईल याची नोंद घ्यावी.

Top Up Premium वेतनातून कपात करण्याचे संमती पत्र देणेबाबत :-

ज्या कर्मचाऱ्यांना मुळ विमा राशी (Basic Sum Insured) रु. ०३ लाखांपेक्षा जास्त रक्कमेचा विमा (Top Up) घ्यावयाचा असल्यास Top Up विमा रक्कम रु. ०१ लाख ते रु. ०७ लाख यापैकी एका विकल्पाची निवड कर्मचाऱ्यास वर नमूद केल्यानुसार अवलंबित सदस्यांची माहिती भरत असतानाच करावयाची आहे.

कर्मचाऱ्यांना उपरोक्त रु.०३ लाखांपेक्षा जास्त रक्कमेचा विमा (Top Up Sum Insured) घ्यावयाचा असल्यास त्याच्या विमा हप्त्याची रक्कम वैयक्तिकरित्या भरावी लागणार आहे. सदर रक्कम कर्मचाऱ्याच्या माहे मार्च २०१७ च्या वेतनातून कपात करण्यात येईल. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी सोबत जोडलेले प्रपत्र (Top Up संमती पत्र) पूर्णपणे भरुन स्वाक्षरीसह ते संबंधीत कार्यालयाच्या वेतन व देयके विभागाकडे विहीत मुदतीत म्हणजेच दि. २१.३.२०१७ पर्यंत अथवा तत्पूर्वी द्यावयाचे आहे. माहे मार्च २०१७ च्या वेतनातून कपात करण्यात आलेली Top Up Premium ची रक्कम एकत्रितपणे सांघिक कार्यालयामार्फत विमा कंपनीस दि. ०५.०४.२०१७ पर्यंत अदा करण्यात येईल. ज्या कर्मचाऱ्यांची माहे मार्च - २०१७ च्या वेतनातून Top Up Premium ची रक्कम कपात झालेली आहे त्याच कर्मचाऱ्यांना Top Up सुविधेचा लाभ देय राहील. माहे मार्च - २०१७ नंतर कुठल्याही कर्मचाऱ्यांच्या वेतनातून Top Up Premium ची रक्कम कपात केली जाणार नाही याची सर्व कर्मचाऱ्यांनी नोंद घ्यावी.

सबब, ज्या कर्मचाऱ्यांना Top Up Premium घ्यावयाचा आहे त्यांनी तसे संमतीपत्र विहीत मुदतीतच देवून Top Up Premium ची रक्कम माहे मार्च -२०१७ च्या वेतनातून कपात करण्यात आल्याची खात्री वेतन व देयके विभागामधून करुन घ्यावी, जेणेकरुन त्यांना Top Up सुविधेचा लाभ योजनेच्या कालावधीमध्ये घेता येईल.

Top Up करिता (रु. ०३ लाखांपुढील) कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने व स्वखर्चाने अदा करावयाची विमा रक्कम व विमा हप्ता (Premium) प्रति कर्मचारी कुटुंब खालीलप्रमाणे राहील. सदर योजना दि. १५.०२.२०१७ पासून सुरु झालेली असून वर नमूद केल्यानुसार माहे मार्च २०१७ च्या वेतनातून कपात केलेली Top Up Premium करिता वर्षभराची रक्कम ही विमा कंपनीस माहे एप्रिल-२०१७ मध्ये अदा करण्यात येवून त्याचा लाभ दि. १५.०४.२०१७ पासून वर्षभराच्या कालावधीसाठी देय राहणार आहे.

रु. ०३ लाखांपुढील विमा रक्कम	संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (Premium) १५ टक्के सेवाकरासह	रु. ०३ लाखांपुढील विमा रक्कम	संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (Premium) १५ टक्के सेवाकरासह
१ लाख	रु. ३४६७/-	५ लाख	रु. ९२०९/-
२ लाख	रु. ५५९५/-	६ लाख	रु. १०२८२/-
३ लाख	रु. ७२७१/-	७ लाख	रु. ११३७७/-
४ लाख	रु.८३९२/-	-	-

Top Up Premium बाबत संबंधीत मानव संसाधन / वेतन देयके विभागाने कर्मचाऱ्यांकडून दि. २१.३.२०१७ रोजीपर्यंत अथवा तत्पूर्वी प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या संमती पत्रानुसार Top Up Premium ची रक्कम माहे मार्च- २०१७ च्या वेतन देयकातून कपात करावी. त्यानंतर ज्या कर्मचाऱ्यांच्या Top Up Premium ची रक्कम वेतनातून कपात केलेली आहे, अशा कर्मचाऱ्यांची नांवे, भ.नि.नि.क्रमांक, कामाचे ठिकाण (विभाग / मंडल / परिमंडळ) व परिमंडळाचे नांव, विमा रक्कम व विमा हप्ता रक्कम याची परिमंडळ स्तरीय एकत्रित यादी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना इंग्रजी भाषेत ईमेलद्वारे (irdho123@gmail.com) Excel Sheet मध्ये दि. ३१.०३.२०१७ रोजी पर्यंत पाठवावी. सदर यादीनुसार विमा हप्त्याची रक्कम सांघिक कार्यालय स्तरावर HRMS प्रणालीद्वारे फेरतपासणी करुन दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांना अदा केली जाईल. विमा कंपनीस सदर रक्कम सांघिक कार्यालयाकडून एकाच धनादेशाद्वारे अदा केल्यानंतरच Top Up सुविधेचा लाभ दि. १५.०४.२०१७ पासून देय राहील.

८. या योजनेमध्ये कर्मचाऱ्यास / अवलंबितास पूर्वी असलेल्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. (Pre-existing Diseases Covered)

९. या योजनेतंर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी ३० दिवसांपूर्वीचा व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर ६० दिवसांपर्यंतच्या उपचारासाठीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे. **(Pre hospitalization upto 30 days and post hospitalization upto 60 days Covered)**

१०. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची **सदर योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती झाल्यास किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी घेता येणार नाही.** सबब, अशा कर्मचाऱ्यांची माहिती दरमहा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना तातडीने ईमेलद्वारे irdho123@gmail.com यावर संबंधीत परिमंडळाच्या मानव संसाधन विभागाने पाठवावी. वर नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती संबंधीत कार्यालयाने मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना न कळविल्यास याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात येवून यानुषंगाने, कंपनीवर येणाऱ्या आर्थिक भाराची वसूली संबंधीतांकडून करण्यात येईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

११. कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना MDIndia (TPA) कंपनीच्या नेटवर्क रुग्णालयामध्ये (MDIndia कंपनीच्या संकेतस्थळावर www.mdindiaonline.com नेटवर्क रुग्णालयांची यादी पहावयास मिळेल) वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. तसेच विना नेटवर्क रुग्णालयमध्ये उपचार घेतल्यास सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय उपचाराची अनुज्ञेय प्रतिपूर्ती (कॅशलेस स्वरुपात न राहता) विमा कंपनीकडून मिळेल.

१२. सामान्य आदेश क्र. २० (क) च्या तरतूदी - (फक्त कर्मचाऱ्यांबाबत)

१२.१ वैद्यकीय सुविधा - कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २० _(क), दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील, त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. मात्र कर्मचाऱ्यांस रु. ३ लाखांपर्यंत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy द्वारेच घ्यावा लागेल. कर्मचाऱ्यांकरीता स्वत:साठी रु. ०३ लाखांपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सामान्य आदेश क्र. २० (क) प्रमाणे लाभ देय राहील. मात्र सदर प्रकरणी केवळ कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय उपचारासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम ही विमा कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा कमी अथवा जास्त असल्यास अशा प्रकरणात स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२ दि. ३०.१२.२००९ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी प्रकरणपरत्वे निर्णय घेतील.

१२.२ वैद्यकीय अग्रीम -

अ) कार्यरत कर्मचाऱ्यांना अपघात झाल्यास अथवा तातडीच्या प्रसंगी ज्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले ते रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी MD India कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये नसेल तर परिमंडल कार्यालयांकरिता उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी व अन्य कार्यालयांच्या बाबतीत संबंधीत विभागातील मानव संसाधन विभाग प्रमुखांने कर्मचाऱ्याच्या सदर प्रकरणाची माहिती MD India कंपनीस दूरध्वनीद्वारे **(MSEB Mediclaim Help Line No. 1860-233-4477)** देवून २४ तासांच्या आत प्राथमिक दावा / सुचनांच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नाव, भ.नि.नि. क्रमांक, रुग्णाचे नाव, रुग्णालयाचे नावं व पत्ता इ. माहितीचा ईमेल देखील msebmediclaim@mdindia.com यावर पाठवावा.

ब) त्यानंतर, स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७७ दि. ०४.०१.२०१४ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रकरण परत्वे कर्मचाऱ्यास वैद्यकीय उपचारासाठी अग्रीम रक्कम मंजूर करावी.

क) कर्मचाऱ्यास वरील प्रकरणी वैद्यकीय अग्रीम महावितरण कंपनीकडून मंजूर करण्यात आला असल्याची सुचना MD India कंपनीस ईमेलद्वारे msebmediclaim@mdindia.com द्यावी.

ड) अप्राणांतिक अपघाताच्या अथवा इतर तातडीच्या आजारांच्या घटनेमध्ये प्रकरणपरत्वे रुग्णालयास कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारासाठी कंपनीकडून अग्रीम रक्कम दिलेली असल्यास कर्मचाऱ्यांने रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर तातडीने वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे सादर करावा. संबंधीत कार्यालयाने सदर प्रस्तावासोबत वैद्यकीय अग्रीम म्हणून रुग्णालयास अदा केलेल्या रक्कमेच्या पावतीची छायांकित प्रत व संबंधीत कार्यालयाचा बँक खाते क्रमांकासह IFSC Code ची माहिती देवून सदर प्रकरणी मंजूर होणारी रक्कम कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठीचे स्वतंत्र पत्र जोडून प्रस्ताव कार्यालय प्रमुखामार्फत MD India कंपनीकडे पाठवावा. MD India कंपनीकडून या प्रकरणी मंजूर रक्कम संबंधीत कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा होईल, त्यानंतरच संबंधीत कार्यालयाने अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

इ) प्राणांतिक अपघाताच्या घटनेमध्ये अथवा वैद्यकीय उपचाराप्रसंगी दुर्देवाने मृत्यु झाल्यास अग्रीम रक्कम मंजूर करुन रुग्णालयास सदर रक्कमेचा धनादेश अदा केला असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण होईपर्यंत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास तितक्या रक्कमेची देयके अदा करण्यात येवू नये.

१२.३ वैद्यकीय प्रतिपूर्ती -:

- कर्मचारी / कुटुंबीयाने MD India कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये उपचार घेतले नसतील व सदर रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी नसेल तर कर्मचारी / कुटुंबातील सदस्यांने १२.२ च्या 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार MDIndia कंपनीकडे **MSEB Mediclaim Help Line No. 1860-233-4477** यावर दुरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे २४ तासांच्या आत प्राथमिक दाव्याबाबत सुचना द्यावी. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर तातडीने झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव MDIndia कंपनीने प्रतिपूर्ती दावा कार्यपध्दतीमध्ये नमूद केल्यानुसार योग्य ती सर्व कागदपत्रे जोडून संबंधीत कार्यालय व समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांचेमार्फत MDIndia कंपनीकडे पाठविणे बंधनकारक आहे.
- सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर MDIndia कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने रु. ०३ लाख मर्यादतेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम मंजूर केली जाईल. सदर रक्कम कर्मचाऱ्याने अथवा अवलंबितांने प्रस्तावासोबत दिलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यावर MDIndia कंपनीकडून परस्पर वर्ग करण्यात येईल.
- कार्यरत कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्याप्रकरणी अथवा तातडीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यास वैद्यकीय अग्रीम अदा केला असल्यास १२.२ च्या 'ड' व 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.
- उपरोक्त प्रकरणी वैद्यकीय उपचारासाठी फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चाची रक्कम ही रु. ०३ लाखांपेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणी स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि. १७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र. २७२ दि. ३०.१२.२००९ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

१३. कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारापोटी या योजनेतंर्गत उपलब्ध असलेली विमा रक्कम रु. ३ लाख कार्यरत कर्मचाऱ्यासाठी खर्च झालेली असल्यास व तद्नंतर कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांकरिता रु. ३ लाखापर्यंतच्या वैद्यकीय विम्याचा लाभ एक विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याकरिता, संबंधीत कार्यालयाने परिमंडळांच्या मुख्य अभियंता यांच्यामार्फत त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. सदर प्रस्तावास संचालक (वित्त) हे कार्यकारी संचालक (मासं) व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मंजूरी देण्यासाठीचे सक्षम अधिकारी राहतील.

१४. म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित व महावितरण कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा रु. २३०/- प्रतिमाह इतका वैद्यकीय भत्ता किंवा त्याऐवजी देय असलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** सुरु असेपर्यत देण्यात येणार नाही.

१५. कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेकरिता दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे व **MDIndia Health Insurance Pvt. Ltd. (T.P.A.)** यांचे मार्फत सर्व परिमंडल कार्यालयात **MDIndia** कंपनीचा प्रतिनिधी समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून उपस्थित राहील. कर्मचाऱ्यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भातील अडचणी सोडविण्याकरिता या समन्वय अधिकाऱ्यांची मदत घ्यावी.

कर्मचाऱ्यांना **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** संदर्भात स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची अथवा चौकशीची गरज असल्यास कर्मचारी अथवा त्याचे कुटुंबिय **MDIndia (T.P.A.)** कंपनीच्या **बहुभाषीक ग्राहक सेवा केंद्राशी खाली नमूद केल्यानुसार संपर्क / संवाद करु शकतात.**

D:\archana\CIRO\mediclaim 2017\Circular mediclaim pollicy 2017.doc

➢ सर्व साधारण चौकशी व कॅशलेस सुविधेच्या सवलतीसाठी हेल्पलाईन क्र. - 1860-233-4477

➢ रुग्णालयात दाखल झाल्याची सूचना देण्यासाठी ईमेल - msebmediclaim@mdindia.com

➢ या योजनेकरिता असलेल्या Enrollment संदर्भातील काही अडचणी अथवा सुधारणा असल्यास त्याकरिता ईमेल - msebenrollment@mdindia.com

टिप :- Enrollment - (Addition / Deletion) संदर्भातील अडचणी लक्षात घेता कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेसाठी Enrollment करिता स्वतंत्र ईमेल (msebenrollment@mdindia.com) तयार करण्यात आलेला असून Enrollment संदर्भातील विषयासाठी ईमेल पाठविताना कर्मचाऱ्यांनी CPF No., वीजसेवकांनी Employee No. ईमेलच्या Subject मध्ये नमूद करणे बंधनकारक आहे.

MDIndia कंपनीचा पत्रव्यवहार व वैद्यकीय प्रतिपूर्तीचे दावे दाखल करण्यासाठीचा पत्ता -

MDIndia Health Insurance (TPA) Pvt. Ltd.
MSEB HCL GMC Claims Department -163600/48/17/07839,
पहिला मजला, कर्नावत टॉवर, पौड फाटा,
दशभुजा गणपती मंदिरच्या मागे, देना बँकेच्या वर,
पुणे- ४११०३८.
(Toll free No. 1860 233 4477)

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या संकेतस्थळावरील **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim** येथे व **RAPDRP-Infoportal-(Circular-I.R.Dept.)** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

10/3/2017

(सचिन ढोले)
कार्यकारी संचालक (मासं)
महावितरण

सोबत : पृष्ठ क्र. १ ते ८

परिशिष्ट - १ - Top Up Premium संमती प्रपत्र
परिशिष्ट - २ - Disease wise (illness) Capping List
परिशिष्ट - ३ - वैद्यकिय प्रतिपूर्ती दाव्यांसाठी प्रपत्र (Claim Form & Check List)

प्रति,
सर्व कार्यकारी अभियंता तत्सम व त्यावरील दर्जाचे अधिकारी,
महावितरण.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

१. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., मुंबई.
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
३. संचालक (वित्त), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या., सांघिक कार्यालय, हाँगकाँग बँक इमारत, फोर्ट, मुंबई.
४. संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (द.व.सु.) / महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

प्रत सस्नेह : सर्व कार्यकारी संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.

D:\archana\CIRO\mediclaim 2017\Circular mediclaim pollicy 2017.doc